# वादळ

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**वादळ : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २७०/-

# वादळ

# १

माझी जन्मभूमी कोणती म्हणाल तर जर्मनी. परंतु माझं बालपण 'ऱ्हाईन' नदीपासून तो 'यांगत्सेक्यांग' नदीपर्यंतच्या अनेक देशांत गेलं. माझ्या बापाचं बहुतेक सारं आयुष्य दर्यावर्दीपणात खर्च झालं. परंतु देशोदेशी भटकणाऱ्या खलाशांच्या अंत:करणात स्वदेशभक्तीची दृढ भावना खोल कुठे तरी असते, तशी ती माझ्या बापाच्याही ठिकाणी होती. मला मात्र त्या भावनेचा संसर्ग लागला नाही. 'नॉर्थ जर्मन लॉईड' कंपनीत माझा बाप नोकर होता. रोजगारानिमित्त त्याला दर्यावर जावं लागे; पण पुष्कळदा कधी या बंदरात तर कधी त्या बंदरात याप्रमाणे आपली बायकामुलं घेऊन त्याला दीर्घकाल मुक्काम करता येत असे. याचा एक परिणाम असा झाला, की मी पुरता चौदा वर्षांचा झालो असेन नसेन तोच मायभाषेच्या जोडीला स्वीडिश, इटालिअन, माले, चिनी अशा कितीतरी भाषा मला येऊ लागल्या. कुठल्याही बंदरातल्या खलाशांशी मी दोस्ती जुळवीत असे, अन् त्यांच्या तोंडची बोली मी चटकन उचलीत असे. माझं बालपण अनेक देशात गेलं याचा दुसरा परिणाम झाला तो असा की सगळेच देश मला आपले वाटू लागले. अमक्या एका देशाविषयी तीव्र आत्मीयता बाळगावी असं मला कधी वाटलं नाही. माझ्या वयाच्या मुलांच्या तोंडून ''हा माझा देश ! माझा देश सर्वांत मोठा अन् चांगला!'' असे उद्‌गार वारंवार बाहेर पडत. ते ऐकले की आपल्या ठिकाणी काही तरी वैगुण्य आहे असं कधी कधी मला वाटे. माझं अंत:करण खिन्न व जड होई; त्या मुलांचा मला मोठा मत्सर वाटू लागे. शेवटी त्यांचं ते देशभक्तीचं प्रदर्शन तत्त्वत:

संकुचित बुद्धीचं अन् तिरस्करणीय होय असं मी त्या अल्पवयातच स्वत:च्या मतीनं ठरवून टाकलं !

माझं शिक्षण अर्थातच थोडं या शहरी, थोडं त्या शहरी, असं झालं. सिंगापूर शहरी आम्ही राहात असताना ज्या इंग्रजी शाळेत मी दोन वर्ष होतो तीच मला स्पष्टपणे आठवणारी माझी पहिली शाळा. सूर्यतापानं रखरखलेल्या अन् साम्राज्यपिपासूंनी शोषिल्या जाणाऱ्या त्या हतभागी पौर्वात्य देशात माझ्या चित्तात प्रथम उजेड पडला, की माझा सामाजिक दर्जा फार खालचा होता. मी कामगाराचा मुलगा होतो. श्रीमंत ऐतखाऊंच्या व अंमलदारांच्या पोरात अन् माझ्यात दुर्लघ्य अंतर पसरलेलं होतं. मी त्यांच्या घरी जाऊ शकत नव्हतो, त्यांच्या खेळात मी सामील होऊ शकत नव्हतो. ती माझ्या घरी आली तर माझ्या आईबापांना तो भ्रष्टाकार वाटे. उंची सुंदर पोषाख केलेली ती पोरं माझ्या पाठीमागं माझा उल्लेख ''कुत्ता'' म्हणून करीत. एक खप्पड तोंडाची हडकुळी इंग्रजी स्त्री आमची मास्तरीण होती, ती उघड उघड एखाद्या अस्पृश्याप्रमाणे मला वागवी. या सर्व गोष्टींचा परिणाम माझ्या मनावर झाल्यावाचून राहिला नाही, मी कामगाराचा मुलगा आहे, मला समाजात मानाचं स्थान नाही, कामगार जिकडे तिकडे भरडले जात आहेत, अन् जगातल्या सर्व देशांतल्या कामगारांनी आकुंचित देशभक्ती ठेवण्यापेक्षा सबंध जगच आपली मायभूमी मानली पाहिजे. इत्यादी कल्पनांची बीज माझ्या मनात कोवळ्या वयातच रुजू लागलं.

मागचं महायुद्ध सुरू झालं तेव्हा आम्ही इटलीत 'जिनोआ' शहरी राहात होतो. १९१५ साली इटाली दोस्तांच्या बाजूनं युद्धात पडला. या घटनेची थोडी आगाऊ कल्पना माझ्या बापाला असावी. इटलीच्या बंदीखान्यात सापडायला नको म्हणून तो इतर काही जर्मन लोकांप्रमाणे आधीच उत्तरेकडील सरहद्द ओलांडून नाहीसा झाला होता. आम्ही मागं राहिलो होतो. एके दिवशी एक भला दांडगा इटालिअन अंमलदार दाणदाण पाय आपटीत अन् मिशीला पीळ भरीत आमच्या घरात शिरला, आणि बारा तासांच्या आत आम्ही इटाली सोडून स्वदेशी चालतं झालं पाहिजे असा त्यानं हुकूम सोडला. बहुतेक सारी चीजवस्तू तशीच टाकून आम्ही 'मिलान एक्सप्रेस' गाठली, अन् रातोरात आल्प्स पर्वताची हद्द ओलांडून जर्मनीत प्रवेश केला. मी आपल्या पितृदेशी परत आलो खरा, परंतु मला तो माझा



देश वाटेना. आमच्याच देशात आमची स्थिती आश्रयार्थ आलेल्या परक्यांसारखी केविलवाणी होती हे मला पदोपदी दिसत होतं.

शाळेतल्या अभ्यासात माझी प्रगती यथातथाच होती. माझं आधीचं शिक्षण दहा ठिकाणच्या शाळांतून झालेलं, त्यामुळे जर्मन शाळेतील अवजड अभ्यासक्रम मला झेपेना. 'श्लुएटर' नावचा गृहस्थ माझा शिक्षक होता. त्याचे दोन्ही मुलगे फ्रान्समध्ये कामास आले होते, आणि ते दु:ख असह्य वाटून त्याच्या बायकोनं आत्महत्या केली होती. अशा उद्‌ध्वस्त संसाराचा सारा राग आमचे ते गुरुजी वर्गातल्या साऱ्या मुलांवर काढीत असत. कुणी एवढीशी खोडी केली अगर प्रश्नाचं उत्तर देताना चुकला, की त्याला छडीनं फोडून काढायचं हा त्यांचा नित्याचा क्रम होता. त्या काळी बिस्मार्क, ल्यूडेन्डॉर्फ हे जर्मनीमध्ये अवतारी पुरुष गणले जात असत. माझी पूजास्थानं अगदी निराळी होती. मॅगेलान, कॅप्टन कुक असे साहसी पुरुष मला अवतारासारखे वाटत, आणि जे. एफ्. कूपर' च्या Red Rover या रोमांचकारी पुस्तकावर माझी भक्ती होती. हे सारे पुरुष त्या वेळच्या जर्मन माणसांच्या दृष्टीने परके व बहिष्कारयोग्य होते, (मी तरी अंत:करणानं परकाच नव्हतो काय ?) कॅप्टन कुक वगैरेबद्दल भक्ती ठेवणं म्हणजे एक प्रकारे देशद्रोहच होता, आणि त्याची फळं आमच्या मास्तरसाहेबांच्या हाती मला भोगावी लागली तर त्यात नवल नव्हतं.

महायुद्धात जर्मनीची आस्ते आस्ते पीछेहाट होऊ लागली. आमचे गुरुजी आणि दोष कायझरकडे आणि युद्धसामुग्रीच्या कारखानदारांकडे होता. कुठं तरी तळघरात लपूनछपून त्यांच्या गुप्त बैठकी चालत, त्यांत मी हळूच सामील होत असे. आम्ही कामगारांचं स्वातंत्र्यगीत मोठ्या आवेशानं धीरगंभीर स्वरूपात म्हणत असू –

"Death to hangmen, king and traitors,
Give the masses bread !
Forward ! 'tis people's slogan
Free we'll be-or dead !"

'Independent Socialists' पक्षातील तरुणांची जी संघटना त्या वेळेस देशात चालू होती, तिच्या प्रवाहात मी लवकरच सापडलो, 'बर्लिन' शहरी क्रांतिकारक पक्षाचे जे पुढारी होते, त्यांनी सबंध जर्मनीभर ठिकठिकाणी गुप्त मंडळं स्थापण्याची मोहीम सुरू केली होती. अशा एका मंडळाचा मी सभासद झालो. ही १९१८ सालच्या

सप्टेंबर महिन्यातली गोष्ट. त्या वेळी माझं चौदावं वर्ष संपत आलं होतं. गुप्त संघातील आम्ही मुलं कुठल्यातरी घराच्या माळ्यावर किंवा कधी कधी छपरावरसुद्धा आपल्या बैठका भरवीत असू. आमच्या संघात जी माणसं वयानं मोठी होती त्यापैकी काहीजण आरमारातून पळून आलेले होते. ते आपल्या गोष्टी सांगत. त्यांचा आम्हा मुलांच्या मनावर फार परिणाम होत असे. आम्ही भांडवलदार श्रीमंतांचा द्वेष करू लागलो, आणि गरिबांनी आपली संघटना करून बंड पुकारल्याखेरीज त्यांची दुर्दशा संपावयाची नाही, हे आमच्या मनावर बिंबलं. विद्यार्थ्यांच्या ठिकाणी राजनिष्ठा उत्पन्न करण्यासाठी होणाऱ्या शाळेतल्या सभा, मिठाईच्या डब्यात लपवून नेलेल्या छोट्या बाँबसच्या किंवा त्वचेला कंड उत्पन्न करणाऱ्या एका विशिष्ट रासायनिक भुकटीच्या साहाय्यानं उधळाव्या, आणि महायुद्धाला मदत म्हणून गोळा करण्यात येणाऱ्या वस्तू चोरून पळवाव्या, अशा प्रकारचा कार्यक्रम आम्ही सुरू केला. फासावर लटकलेल्या कायझरचे व्यंगचित्र काढून ते वर्गातल्या साऱ्या विद्यार्थ्यांत आम्ही फिरवीत असू आणि जुलमी सत्तेविषयीचा संताप व्यक्त करण्यासाठी पोलीस चौकीच्या खिडकीतून मेलेले उंदीर आम्ही आत भिरकावून देत असू.

माझा बाप आणि आरमारातले इतर कामगार मधून मधून दोन दिवसांच्या रजेवर घरी येत. त्यांच्याकडून आम्हाला कळे, की जर्मन सैन्यात आणि आरमारात विशेषत: आरमारात तीव्र असंतोष उत्पन्न झाला होता. बंडाची चिन्हे दिसत होती. खलाशी खुशाल नोकरी टाकून पळून जाऊ लागले होते. आरमारात फंदफितुरी माजविण्याच्या आरोपावरून पुढाऱ्यांना गोळ्या घालून ठार करण्यात येत होतं. १९१८ सालच्या ऑक्टोबरमध्ये जर्मन आरमार अखेरचा निकराचा हल्ला इंग्लंडवर करणार अशी बातमी आली. परंतु दुसरीही एक बातमी लोक एकमेकांना सांगू लागले ती अशी, की असला हल्ला करणं म्हणजे आपण होऊन जलसमाधीची तयारी करण्यासारखं आहे ही गोष्ट आरमारावरचे सैनिक जाणून होते. आणि त्यांनी बंड करण्याचा निश्चय केला होता. आरमारी हल्ला करण्याचा बेत जागच्याजागीच जिरला, लढाऊ जहाजं परत बंदरात आली. बिथरलेले खलाशी शहराशहरांत घुसले, आणि बंडाची जी ज्वाला दर्यावर भडकणार होती ती आता देशात ठिकठिकाणी भडकली.

'जर्मन सोव्हिएट रिपब्लिकचा विजय असो' अशी घोषणा करीत उठलेल्या सशस्त्र लोकांनी कित्येक शहरांतील प्रमुख ठाण्यांचा ताबा घेतला. बर्लिन, हाम्बुर्ग



इत्यादी शहरी सोव्हिएट सत्ता स्थापन झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या. कायझर हॉलंडकडे पळून गेला. दोन दिवसानंतर तह झाला, आणि महायुद्ध संपले. माझा बाप या बंडाच्या ऐन धुमश्चक्रीत होता. १९१९ सालच्या जानेवारी महिन्याच्या वीस तारखेस तो एका हॉस्पिटलमध्ये मरण पावल्याची बातमी आम्हाला कळाली.

मी शाळेत जायचं केव्हाच सोडून दिलं होतं. आमच्या शहरात म्हणजे ब्रेमेनमध्ये बंडाची जी उठावणी झाली होती, तिच्यात गुप्त संघातील आम्ही तरुण मुलं कामगिरी करीत होतो. रोज सकाळी संघाच्या मुख्य ठाण्यावर जावं, तेथून क्रांतिकारक लिखाणांची छापील पत्रकं घ्यावी, आणि मग ती बंदरावरच्या खलाशांत, कारखान्यांतल्या कामगारांत आणि चाळीचाळीत राहाणाऱ्या मजुरांत वाटण्याची कामगिरी करीत दिवसभर सायकलवर भ्रमंती करावी, असा माझा क्रम होता. आमच्या शहरात छोट्या छोट्या चकमकी, दंगे, जाळपोळ इत्यादी प्रकारांनी ऊत आला होता. खलाशी, कामगार आणि मजूर आवाज फाटेपर्यंत ओरडत रस्त्यारस्त्यातून हिंडत असत. पोलिसांनी प्रतिकार केला तर हाती असतील त्या आयुधांनी हे चेतलेले लोक त्यांना मारून पिटून काढीत. एखादा अंमलदार दिसला, की यांची त्याच्यावर झडप पडे आणि मग त्याचा निकाल व्हायला वेळ लागत नसे. एकदा रेल्वे स्टेशनच्या बाहेर समोर भर चौकात मी एक भयंकर प्रकार पाहिला. एक अंमलदार स्टेशनच्या बाहेर आला त्याचं पाऊल पुरतं रस्त्यात पडलं नाही तोच बंडखोरांनी त्याला वेढा दिला व त्याला आज्ञा केली ''सब कुछ निकालो !'' शस्त्र स्वाधीन करण्याची तो अंमलदार अळंटळं करू लागला; पण त्याचा हात पिस्तुलाकडे जातो न जातो तोच त्याच्यावर झडप घालून त्याला जमीनदोस्त करण्यात आलं. एखाद्या कुत्र्याला बडवावं त्याप्रमाणं बंदूकांच्या दस्त्यांनी ठेचून त्याचा प्राण घेण्यात आला. मग बंडखोर परत फिरले आणि जयघोष करीत निघून गेले. अंगावर शहरा उभे करणारा तो प्रकार मला पाहवेना. परंतु पाहिल्याशिवाय राहवेना. भयंकर गोष्टी पाहण्याची माणसाला हौसच असते की काय कोण जाणे ? तो सारा प्रकार आटोपल्यावर मी दूर होऊन आपल्या मार्गाला लागलो; परंतु माझं पाऊल जड झालं होतं, अंत:करण बधीर झालं होतं; अशी भयंकर हत्या आणि अत्याचाराच्या इच्छेनं पेटलेल्या लोकांच्या क्रोधाच्या ज्वाला मी त्या दिवशी प्रथमच पाहिली होती. वाटेनं जाताना माझ्या मनात सारखं येत होतं. 'इतक्या सहजासहजी माणूस माणसाचा प्राण घेऊ शकतो ?'

सरकारनं धोरण ठेवलं. ठिकठिकाणी त्यांची कत्तल करण्यात आली, आणि पाळमुळं खणून काढण्यात आली. बंडाची लाट परतून ओसरणार असं स्पष्ट दिसू लागलं. इतर शहरी जे झालं तेच आमच्या ब्रेमेनमध्ये झालं. आमच्या पक्षाची वाताहात झाली, ज्याला जो मार्ग दिसला तिकडे तो पळाला. मीही शहर सोडून पळालो. तीन दिवस भटकल्यानंतर मी हाम्बुर्ग शहरी पोहोचलो.

स्टेशनवरून मी माझ्या आईला एक कार्ड लिहून टाकलं, की मी जिवंत आहे, काळजी करू नकोस. तिनं कुठून तरी पैसे गोळा करून तारेनं धाडले आणि दुसऱ्या दिवशी ती स्वत:च हाम्बुर्गला येऊन मला भेटली. एखादं पिशाच्च दिसल्यावर माणासाचा चेहरा व्हावा तशी चर्या मला दिसली. ती मला म्हणाली, ''घरी चल.'' मी म्हटलं, ''मला नाही घरी यायचं, मी आता खलाशी होणार, आणि कुठं तरी दूरदेशी जाणार.''

ते ऐकून ती अगदी स्तब्ध बसली. तिच्या डोळ्यात किती अपार दु:ख भरून आलं ते मात्र मला स्पष्ट दिसलं. आसवांनी भरलेल्या दृष्टीनं माझ्याकडे पुष्कळ वेळ पाहात राहिल्यावर ती अखेर म्हणाली,

''तू दर्यावर जायचं म्हणतोस, पण आपल्या देशाचं एक तरी जहाज आता शिल्लक कुठं आहे ? सारी इंग्रजांच्या ताब्यात आहेत ना ?''

मी म्हटलं, ''कुठल्या तरी परदेशी जहाजावर धरीन नोकरी !''

नंतरच्या दिवसांत माझ्या आईनं घरात उरलेलं किडुक-मिडुक विकून टाकलं, आणि कपडेलत्ते, बूट इत्यादी वस्तू माझ्यासाठी खरेदी केल्या. अखेर ती परत गेली तेव्हा हाम्बुर्गच्या स्टेशनवर मी तिला पोहोचवायला गेलो. गाडी हलली तेव्हा डोळ्यांतील अश्रू आवरीत, आणि आपल्या चेहऱ्यावरची दु:खाची व्यथा लपवीत खिडकीबाहेर तोंड काढून ती मला हलकेच म्हणाली,

''तुझा प्रवास तुखाचा होवो ! ईश्वर तुझं रक्षण करो !....''

मी हाम्बुर्ग शहरी होतो, ते वसंतऋतूचे दिवस होते. कोठल्या तरी जहाजावर नोकरी मिळावी, दर्यावर जावं, अन् नशीब काढावं अशी माझी तीव्र इच्छा. ती पूर्ण करण्यासाठी धक्क्याधक्क्यांवरून पुष्कळ भटकलो, पण त्यावेळी हाम्बुर्गचा तो सबंध समुद्रतीर झोपी गेलेल्या एखाद्या राक्षसाच्या विराट देहासारखा भासला, अमेरिकेहून धान्यानं भरून येणारं एखादं दुसरं जहाज अन् किनाऱ्यावरच्या बंदराबंदरांतून हिंडणारी



मालाची छोटी गलबतं, याखेरीज हाम्बुर्गच्या समुद्रावर दुसरी कसली देखील हालचाल दिसण्यास तयार नव्हती. कारण तह झाल्याला जरी कित्येक दिवस लोटले होते, तरी इंग्रजांनी नाकेबंदी अजून चालूच होती. दिवस मोठे चमत्कारिक आले होते.

उपाशी पोटी उठावं आणि निजावं देखील उपाशी पोटीच, अशा प्रकारे मी दिवस घालवीत होतो. भुकेपायी मनुष्य काय हवं ते करतो, आणि भुकेने व्याकूळ झाल्यावर मोठी माणसंदेखील लहानाहून लहान होऊन वागू लागताता हेच खरं ! माणसाच्या जीवापेक्षा फळांनी भरलेलं पोतं अधिक मोलाचं वाटावं अशी परिस्थिती झाली होती. एकदा बाजारात एका बागवानाची फळांनी खचून भरलेली गाडी लोकांनी लुटली. त्या लुटीत सामील होऊन फळं उचलीत असता मला एका मध्यम वयाच्या माणसानं ढकललं, तेव्हा उभं राहून त्याच्या तोंडात भडकविण्याखेरीज दुसरं काय करणं मला शक्य होतं ? त्यावेळी माझं पंधरावं वर्ष चालू होतं.

एकदा लोकांनी मासळी-बाजार लुटला तेव्हा त्या दंगलीत मीही सामील झालो. फरसबंदी रस्त्यावर मणावारी मासळी इतस्तत: उधळली गेली होती, पुरुष-बायका, पोरं हातात घेता येतील तेवढे मासे घेऊन पळ काढीत होती व बेहोष होऊन आरडत ओरडत होती. अशा प्रसंगी कसलं भय आणि कसली नीती उरणार ? पोलीसानं अडवलं तर हातातल्या भल्या मोठ्या माशानंच त्याच्या तोंडावर फटका लगवायचा, नाही तर दुसरं काय करायचं ? काळ असा विचित्र आला होता, की घासभर अन्नासाठी आपल्या शीलाचा मोबदला द्यायला तरण्याताठ्या मुली तयार होत्या, किंवा बाजारबसवीचा धंदा करणारी एखाद्या सैनिकाची वयस्क विधवा हवे ते निर्लज्ज रंगढंग करायला कबूल होती. अशा परिस्थितीत शांततेच्या कायद्याच्या, नीतीच्या मंत्रोच्चाराला काही अर्थ उरला असणं शक्य होतं काय ?

सांडपाण्याच्या गलिच्छ प्रवाहात सापडावं आणि आजूबाजूस स्वच्छ कोरडी जमीन कुठेही दिसू नये, असं झालं की त्या प्रवाहाबरोबर माणूस वाहात जातो ! माझी हीच अवस्था झाली. अन्नासाठी आणि नोकरीसाठी मी वणवण भटकत होतो, काय पाहिजे ते करायला तयार होतो. शहरात लहान मोठे दंगे तर सारखे चालू होते. क्रांतिकारक आणि पोलीस यांच्यात लहानमोठ्या चकमकी सुरू होत्या. या झडपडीत बहुधा नेहमी कामगारांचा पराभव झालेला मला दिसे; आणि त्यामुळे त्यांच्याविषयीचा माझ्या मनातल्या कैवार व सहानुभूती अधिकच बळावत असे.